तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर

मयुरा नायक

संजना कोठारे

वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



वर्ष ८५ वे) प्रभुतरुण मुंबई, बुधवार, ता. १६ माहे जून, सन २०१० (अंक ९७१


*संपादकीय*

## सलाम

-सुहासिनी कीर्तिकर



विहंग नायक

'गाडी आली, गाडी आली झुक झुक झुक. शिटी कशी वाजे बघा, कुक कुक कुक'- कविता आठवते? अलीकडच्या शब्दात बालगीत? किंवा मग 'आधी होते मी पणती, घराघरांतुनी मिणमिणती' किंवा 'चालला चालला लमाणांचा तांडा, एका गावाहुनि दुज्या गावाला'? मला खात्री आहे की माझ्या पिढीच्या सर्वांचेच लहानपण या कवितांनी श्रीमंत झाले होते. कवी वि. म. कुलकर्णी यांच्या या कविता. त्यांचे नुकतेच निधन झाले. बातमी वाचताक्षणी मनात तरारून जाग्या झाल्या या कविता. श्रद्धा आणि आशावाद जपणाऱ्या त्यांच्या अनेक ओळींनी पुढे जाणत्या वयात मनाला भुरळ घातली.

'दगडाचा जन्म जरी लाभला स्वभावे, देवा तुझ्या दारीची मी दीपमाळ व्हावे'- अशासारख्या कितीतरी ओळी आजही मनात पिंगा घालत त्यातील भाव मनापासून खरा मानत आहेत. अशाच आणखी ओळी-

'असे जगावे की जगण्याने मरणालाही दुःख फुटावे'-! वाव्वा! अशा ओळींनी वि. म. गेले आज; तरी त्यांचे कवितेतले जगणे अमरच राहणार.

'मरणालाही दुःख फुटावे' या ओळींचा आपल्या खाजगी आणि सार्वजनिक जीवनातही आपण प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असतोच. 'नेहरू गेले तेव्हाची गोष्ट' म्हणूनच मग तयार होते. ज्ञातीपातळीवर त्याचा उद्रेक सार्वजनिक रूप घेतो. श्री. सुहास कोठारे गेले तेव्हा हेच घडले. श्री. प्रमोद नवलकर गेले तेव्हा हेच घडले. श्री. विहंग नायक गेले तेव्हाही हेच घडले. 'मरणालाही दुःख फुटावे' असे या सर्वांचे जगणे होते. नऊ जूनला श्री. विहंग यांचा दुसरा स्मृतीदिन. माधुरीवहिनींना, गुंजारव-मयुरालाच नव्हे; तर आपल्या साऱ्यासाऱ्यांना नऊ जून आठवणींचा जबरदस्त विळखा घालतो. दुःख, आठवणी उमळून येतात या दिवशी. विहंगसारख्या संपादकाला, ज्ञातीकार्यकर्त्याला, कलावंताला, स्नेह्याला 'एकच ठावे' होते;- 'प्रकाश द्यावा सकलाला'. प्रिय विहंग, या दिनी मन तुमच्याशी थोडा संवादही साधते. कसे आवरू या मना?

पण ह्या अनावर मनाला केवळ आठवणींचे तरंग हेलावत नाहीत. त्यांनी 'प्रभुतरुणा'च्या 'युवामंच'ला जो आकार दिला, त्याचं आज विकसित, विस्तारीत रूप

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## PRATYUSH 2010

- Mayura Nayak

A feeling of déjà vu is settling into me as I proudly announce another triumph, another feather, a rather bigger feather in our cap! Yes, we have done it all over again; the verdict is out that Pratyush 2010 is a SUPER DUPER BUMPER HIT!

June 6, 2009, witnessed the beginning of a new rising – Pratyush (as the name suggests). Pratyush'09 was the first show of its kind organized in our community. With approx. 70+ participants, a meticulous and professional choreographer like Vishwas Natekar, a talented director like Pooja Ajinkya and a tremendously enthusiastic team of Yuva Manch, we knew we had a winner in our hands! We just could not go wrong with our formula and of course we didn't! Pratyush'09 still goes down in the history of Pathare Prabhu's as the first ever mega event organized within the community! We had marked our arrival and we were here to stay!

But history is witness to this fact that such magic can rarely be repeated! As we all know there can never be another movie like SHOLAY, we were aware of the pressure of recreating Pratyush. Expectations were soaring high and we would not accept faltering on these expectations! We were determined to defy history this time! From the time we started conceptualizing Pratyush 2010 till the final execution we all knew at the back of our minds somewhere deep down inside, that we had to excel our past performance. We had the whole community eyeing us to know what we do next and we had to live up to all your expectations!

After six months of ground work and planning for the event, and one and a half month of rigorous rehearsals, the day had finally dawned, June 05, 2010. We all gathered at the auditorium at 8.30 a.m. in the morning to conduct a final round of grand rehearsal. Soon the stage was ablaze with glittering lights and the backstage was buzzing with all the performers queuing up for their performances. All participants lined up for their make-up, our director Mr. Satish Joshi and choreographer Mr. Vishwas Natekar performed a quick 'puja' on the stage, gave us their blessings and then it was SHOWTIME!

The curtains rose to a packed auditorium! As soon as the audio-visual flashed the thundering sound of claps filled the auditorium and we could sense a slight feeling of victory nudging us already then, but we resisted the temptation of allowing it to take over our minds. Pratyush 2010, presented a story of two Pathare Prabhu families portrayed by some of the talented members of our community, well woven with dance performances that entwined the complete story. The story had all the ingredients of a typical 'bollywood masala' flick. Comedy, drama, action, romance, tragedy, you name it and it was all there! This musical drama had an array of dance performances. From Bhangda to Lavani, from mushy romance to peppy numbers, from retro to funky songs, from sizzling item numbers to folk songs! We had dancers grooving to all kinds of music! Dancers from all age

(Cont. on Page 2 col.3)

(पान १ कॉलम २ वरून)

पाहातानांही मन आनंदाने भरून येतं; हेलावतं. नऊ जूनच्या आसपासच हा युवामंच 'प्रत्युश' साजरा करतो. प्रत्युश म्हणजे नवी उभारणी, नवीनतम उगवणं. गेल्या वर्षी अतिशय उत्कृष्ट सादर केलेल्या प्रत्युशनं यावर्षीही सुहास कोठारे आणि विहंग नायक यांना मानवंदना देत वरताण कडी केली. विहंग गेले खरे; पण 'तुम्ही गेला अणिक तुमचे देवपण कामा आले' याची प्रचिती या कार्यक्रमाच्या यशानं दिली. युवामंचच्या तुमच्याबद्दलच्या आदरभावात, आदर्श जाणीवात विहंग, आम्हा सर्वांची भावओंजळ होतीच, आहेच.

'युवामंच' आज उसळी घेऊन तरारतो आहे.नेत्रदानाचा विधायक उपक्रम त्याने हाती घेतलाय. लहान बालजीवांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना कार्यक्रमात सामावून घेत त्यांनी जबाबदारीने तरुणाई सांभाळली आहे. आजच्या प्रचंड गजबजत्या जीवनात ' श्वासाचं अंतर' टिकवतांना कुणाचीही दमछाक होणं सहज आहे. जागतिकीकरणाचा रेटा, आर्थिक स्पर्धेत यशस्वी होऊन आजच्या जगात स्वत:चं स्थान टिकविण्याची धडपड आणि जिद्द, स्वत:चा संसार, स्वत:ची माणसं आणि त्यांचं सुख या सगळ्यात आजचा तरूण स्वत:ला सिद्ध करण्यासाठी जीवाची, बुद्धीची बाजी लावतो आहे. पण विशेष म्हणजे पाठारे प्रभू युवक संस्काराचीही बाजी लावतो आहे. 'स्वत:ची माणसं आणि त्यांचं सुख' या संकल्पनेची त्याची व्याख्या व्यापक आहे. स्वत:ची माणसं म्हणजे त्याच्या लेखी फक्त कुटुंबीयच नव्हेत; याचं त्याला भान आहे. ज्ञातीबांधव हेही 'विश्वची माझे घर' प्रमाणे त्याचे कुटुंबघटकच आहेत. स्वत:चा आनंद या घटकात वाटून घेणं, स्वत:च्या एकजुटीनं आनंद वाढवत जाणं हे त्याला स्वभावगत धर्मकार्य वाटतं.

या त्याच्या वृत्तीचा परवाच्या 'प्रत्युश१०' मध्ये प्रत्यय आला. 'आनंद द्यावा, आनंद घ्यावा, आनंद अनुभवावा, आनंद भोगावा' या त्याच्या धारणेपायी कष्ट भोगण्यास, ज्ञातीयांचं प्रेम अनुभवण्यास, आनंद देण्याघेण्याच्या व्यवहारात तो सदैव सिद्ध आहे. अतिथी संपादक म्हणून या तरुणाईनं मागे एकेक अंक सिद्ध केला. पुढचं पाऊल म्हणून दर अंकात 'युवामंच'चं एक पान असतं अन् दिवाळी अंक तर त्यांचाच प्रयत्न घेऊन प्रकाशमान होतो. 'प्रभुतरुणा'चा वर्धापनदिन त्यांच्याच आखणीनं वर्धमान होतो. मला खात्रीच आहे की सुहास कोठारे आणि विहंग नायक यांच्या स्वप्नातली तरुणाई अशीच होती.

विहंग यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना भावांजली वाहतानाच या तरुणाईची कर्तबगारी बघून त्यांना मी भावपूर्ण सलाम करते. आमच्या; नव्हे; आपल्या 'युवामंच'ला खरोखरच सलाम.

सलाम राजे हो!

●

---

(Cont. from Page 1 col.4)

groups rocked the stage! Thanks to Mrs. Pramila Talpade with whose initiative we had senior ladies grooving to a popular retro song – 'Shola jo bhadke'. They looked lovely on the stage winning numerous cheers and screams of 'once more' from the audience! Their enthusiasm and grit to go up on stage at that age and perform to a live audience unhesitatingly was much commendable. Vishwas sir would fondly call them 'little ladies' they were indeed little pretty ladies! If on one hand we had our senior members the juniors were not lagging behind! We got a roaring response with around 20 kids live on stage the youngest being a little more than 2 years old if I am not mistaken. These kids were the star attraction of that evening! No stage fright, full of confidence, and exuberance, these kids just stole the show! And now coming to the rock stars! Yes our very own dancers and actors who slogged for one month continuously to make the show what it is. It is indeed difficult to believe but for many of these actors it was their first stint at acting! They had to learn as quickly as they could and deliver at the same time! Indeed a tough time for most of them learning the dialogues, expressing, understanding timing especially for comic scenes, I must say! And now talking about our dancers! The efforts that these dancers have put in cannot be expressed enough in words. Whoever has seen the dances, will surely agree that as far as the choreography is concerned, the bars had been raised higher. Thus making it even more difficult for not just the non dancers, but also the dancers to get a grip over the dances! But the rock stars that they all are they could all manage it in the limited time span of one month given to them! A great team effort by the committee members, the hard work and perseverance of all the actors and dancers along with the cooperation of the Prabhu Tarun board made this event a grand success!

Of course my editorial is incomplete without thanking a few people who have contributed in a big way towards this show. Firstly a big 'thank you' to all the donors who have generously contributed funds, so that we could give this platform to our community members to showcase their talent. I'm sure with your support we will grow manifolds in the future and also form a base for bringing this talent on one platform and do more work within the community. We are very grateful to our event sponsor Videocon International for their support. And even more grateful to Mr. Vinay Nayak, who has helped get the sponsorship. We also take this opportunity to thank Mr. Pradeep Dhairyawan for helping us in our times of need, by providing us a venue for rehearsals completely free of charge. Of course Pratyush 2010 would never be the same without Mr. Vishwas Natekar and Mr. Satish Joshi. For Vishwas this was his second year with us and he had painstakingly worked on this project as his own baby! Although a professional he went out of his way to see that this show was a hit by creating some wow moments in the show. His assistants Shraddha Chavan and Aniket Jadhav along with him toiled through the days and nights, to ensure our participants were getting their each move right! Training a set of non dancers within a span of one month and making them perform difficult steps and stunts was an impossible task at hand, but he made it happen! Hats off to you Vishwas sir! For Joshi kaka this project began more than two months back, from the time we briefed him on the show. He was the brain behind the script and also directed the play. He had given his two months to this show, and ensured that we were able to put up a great act together. Understanding our requirement and then scripting accordingly as per the taste of the audience wasn't an easy task. It was his dedication and hard work that such a convincing act could be staged. On behalf of Prabhu Tarun I would like to wholeheartedly thank both Vishwas sir and Joshi Kaka for their priceless contribution towards Pratyush 2010. Last but definitely not the least a very big 'thank you' to all the 70+ participants and all the backstage and on field volunteers who dedicated themselves to this show and made Pratyush 2010 what it is!

Before I conclude, I would like to share some of my thoughts or should I say lessons that we learnt during the making of this show. When we began planning for the season 2, we had certain apprehensions like; will we have the same number of participants this year as last year? Can we put up a show as great as or better than last year? Will the community support us again and come to see our show? Etc. Apprehensions were many but no solutions! We decided to take each day as it comes and work out every task as it comes. Slowly everything started falling in place just like a jigsaw puzzle. We learnt that sincere effort and hard work coupled with good intent is always rewarded. Whether it was for the skit or for dance, we got an overwhelming response from the community. Of course there were some who didn't turn up, but there were double the number of fresh participants whom we welcomed with open arms! When something on such a large scale is organized it is not possible to keep everyone happy, you win some you lose some! With changing times expectations also change! Way back in 1997, as teenagers when we used to dance in community events we used to be happy with just a venue available for rehearsals. The icing on the cake would be occasional visits by the then Editor of Prabhu Tarun Late Mr. Suhas Kothare who used to often treat us with 'vada pav' and soft drinks! We never even dreamt of demanding snacks or refreshments while rehearsing and would happily sustain on just water for most days, which was also brought from our respective homes! Today it is binding for us to offer these comforts to our participants as is what they expect from us. We never even had the audacity to question the choreographer's choice of dancers or even suggest who he should take in which dance back then because we had full faith in him. But today we have to handle such issues not only from dancers but also entertain parents' requests. In this process if we have hurt any of the participants or their family members then we would like to clarify that there was no intent of doing so, but we were only trying to be as impartial to all participants as possible giving all a fair chance! Here, I would like to take the liberty and proudly state that today Pratyush is not just a platform for talented people to showcase their talent, but it is a ground to hone our skills and do things which we would never be able to do, anywhere outside. We appeal to everyone to please look at this platform as an opportunity and appreciate what it can offer you, than mull over what you could not do. If we all work together with this mind set we all will be better artists and deliver bigger and better performances in the future. Well, as they say "As you sow, so shall you reap." I can proudly declare that we have got our due credit for all the efforts we have put in the show. Together with our gang of participants we have recreated SHOLAY, and will keep doing so for years to come! ARE YOU ALL WITH US?

---

## लक्ष द्या

रसिक वाचकहो, 'प्रत्युश'ने हा अंक व्यापलेला असल्याने या अंकात किस्से कोर्टातले, शिदोरी, हास्यरेखा ही नेहमीची सदरे नाहीत. पुढील अंकी ही लोकप्रिय सदरे असतीलच. कृपया, नोंद घ्यावी.

# प्रतिक्रिया

फारच छान. प्रत्युश १० चा कार्यक्रम व्यावसायिक पातळीवर झाला. गुंजारव नायकच्या अभिनयात विहंग नायकांची आठवण होत होती. विहंगचा आभिनय त्याने जसाच्या तसा उचलला आहे. समाधान वाटले. सगळ्या कलाकारांना शेवटच्या नृत्याच्यावेळी मंचावर आणून त्याचे उत्तम सादरीकरण झाले. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम कळसास पोहोचला. ज्ञातीतील इतक्या कलाकारांना एकत्र आणणे म्हणजे खरच चेष्टा नव्हे! खूपच कठीण गोष्ट. ही फार अवघड गोष्ट 'युवामंच'ने साध्य केली आहे. त्यांच्या उर्जेचे अभिनंदन.

मात्र एकच. कार्यक्रमस्थळ जाण्यायेण्या-साठी अडचणीचे होते. पुढील वर्षी शक्य असल्यास हा कार्यक्रम पार्ल्यात दिनानाथसारख्या ठिकाणी करावा. बाकी कार्यक्रम फक्कड!

**-वीरपाल राणे**
(पा. प्रभु चॅरिटीज, विश्वस्त)

●

गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही प्रत्युश१० वाजतगाजत दिमाखात आला आणि सर्वांची मने जिंकून गेला. मुरलेल्या लोणच्याप्रमाणे याची लज्जत उत्तरोत्तर अशीच वाढत राहो, या शुभेच्छा.

**-मिनाक्षी जयकर**
(कार्यकारी संपादिका)

●

आज ९ जून रोजी हे लिहितांना कै. विहंग नायक यांच्या पुण्यस्मृतील अभिवादन! त्यांनी व कै. सुहास कोठारे यांनी मोठ्या प्रेमाने लावलेल्या 'युवा मंच' या रोपट्याला दोघांच्याही पुढील पिढीने खतपाणी घालून बहरास आणल्याचा प्रत्यय गेल्या वर्षीच्या प्रत्युश१ व यंदाच्या प्रत्युश२ यांचे यशस्वी प्रयोग पाहतांना प्रकर्षाने आला.

यंदाच्या प्रयोगाची भावलेली खासियत म्हणजे त्यातील नाट्यकथानकाच्या दरम्यान चपखलपणे गोवलेल्या नृत्यप्रयोगाचे आयोजन. यामुळे या प्रयोगाला एक वेगळीच खुमारी प्राप्त झाली.

प्रभुतरुणाच्या सर्व कार्यकर्त्यांना व या प्रयोगात सहभागी झालेल्या ज्ञातीच्या, नवपिढीच्या सदस्यांना या निमित्ताने शुभेच्छा व पुढील 'प्रत्युश' कार्यक्रमाबद्दल उंचावलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यात त्यांना यश येवो हीच प्रार्थना.

**-मधुकर तळपदे**
(पा. प्रभु चॅरिटीज, विश्वस्त)

●

काही वर्षांपूर्वीची आठवण झाली. पेपरमध्ये यात्रा कंपनीची एक जाहिरात वाचली होती. ''भव्य-दिव्य- अमेरिका!'' तसेच ''प्रत्युश-२०१०'' हा कार्यक्रम पाहाताना वाटले. 'भव्य-दिव्य-सुंदर''. अतिशय सुंदर, आखीव, रेखीव, शिस्तबद्ध व तीन तास निर्भेळ आनंद देणारा, करमणुकीचा कार्यक्रम!

युवामंचच्या तरुण मंडळींनी २-३ वर्षांपासून ते ७०-७५ वयाच्या सर्वांना एकत्र आणून हा कार्यक्रम सादर केला. आम्ही सारे प्रेक्षक या बाल-तरुण-वृद्ध सर्वांच्या कंपनीत डुंबून गेलो. आखून दिलेल्या थोड्या वेळात इतका सुंदर, रेखीव कार्यक्रम ही खरोखरच आश्चर्याची बाब आहे! व्यावसायिक कलाकारांच्या तोडीचा किंबहुना त्यांना लाजवील इतक्या ताकदीने हा कार्यक्रम साजरा केला गेला. नाटकाचा विषय, त्यातील लिखाण व सर्व कलाकार उत्तम! नाटकाच्या विषयातच गाणी व नाच यांचा समावेश करून ते चित्रपट रुपाने सादर करणे ही कल्पना खूप आवडली. सलगपणे नाटक किंवा एका पाठोपाठ नाच व गाणी असा क्रम लावला असता तर ते कदाचित कंटाळवाणे झाले असते. आम्ही प्रेक्षकांनी मुद्दाम चूक काढायचे ठरविले असते तरीसुद्धा छोटीशीदेखील चूक काढायला कलाकारांनी जागा ठेवली नाही.

''प्रत्युश-२००९'' हा कार्यक्रम काही अपरिहार्य कारणास्तव पाहायला मिळाला नाही. त्या कार्यक्रमाची स्तुती सर्वांकडून ऐकली होती; म्हणून ह्या वर्षी कार्यक्रम पाहण्यास आम्ही उत्सुक होतो; माझ्या मते ह्या वर्षीचा कार्यक्रम गेल्या वर्षीपेक्षाही चांगला झाला असावा व दरवर्षी जास्तच चांगला होवो अशी आशा करते. आम्हा उभयतांचा प्रभुतरुण संपादक मंडळ, विश्वस्त, युवामंचचे सभासद व सर्व कलाकार यांना शुभेच्छा!

**-सौ. अनुराधा व**
**डॉ. विनोद धुरंधर**

●

प्रत्युश-२०१०चा अनुभव म्हणजे आनंदानी आणि मनोरंजनानी पुरेपूर भरलेली एक सुरेख संध्याकाळ.

एका कथानकाभोवती संगीत आणि नृत्यांची बरसात गुंफलेली पाहातांना प्रत्येकजण तल्लीन होऊन कार्यक्रमाचा आस्वाद घेत होता.

ज्ञातीमध्ये कलागुण आहेत हे माहीत होतं; परंतु एखाद्या व्यावसायिक पर्फार्मन्सपेक्षाही उत्तम व प्रेक्षणीय आणि श्रवणीय असा कार्यक्रम सादर केला गेला. मुख्य म्हणजे प्रत्येक कार्यक्रमामध्ये कुणी ना कुणीतरी ओळखीच्या नात्यातल्या व्यक्ती म्हणजे मुलंमुली, स्त्रिया व बालके बघून आपल्या स्वकियांचा जास्तच अभिमान आणि कौतुक वाटत होतं.

सहभागी कलाकारांचं कौतुक करावं तितकं थोडंच आहे. प्रभुतरुणाच्या व्यवस्थापकांचे इतका सुंदर कार्यक्रम ज्ञातीबांधवांना भेट दिल्याबद्दल आभार.

प्रत्येक वर्षी प्रत्युश असाच चालत राहावा ही इच्छा.

**-बागेश्री परीख**

●

## 'प्रत्युश' नव्हे जल्लोष २०१०

२०१०च्या या जल्लोषाची सुरवात झाली ती ६ फेब्रुवारी 'प्री प्रत्युश' पार्टीने. त्या पार्टीत 'प्रत्युश-२०१०'करण्याचे जाहीर केले. तेव्हापासूनच या जल्लोषाचे वेध लागले.

कधी प्रत्युशच्या तालिमी सुरू होतात आणि आम्ही सहभागी होतो; याची आम्ही सर्वजण वाट पाहात होतो. '१ मे' पासून विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघाच्या टिळक मंदिरात या पर्वाची सुरवात झाली. विश्वास नाटेकरसरांच्या तालमीत आमचे पाय नाचू लागले आणि सतीशकाकांच्या मार्गदर्शनाखाली आमच्यातील नाट्यछटा उमलू लागल्या. नृत्याची तालीम विलेपार्ले येथे तर नाटकाची खारच्या पुतळाबाई हॉलमध्ये होत होती. प्रत्येकजण आपला पूर्ण सहभाग देत होता. तालिमीबरोबरच आम्ही एकत्र येऊन धूडघुसही खूप घातला, मजा केली, एकमेकांना चिडवले. जुन्या-नव्या कितीतरी चेहऱ्यांची ओळख झाली ती केवळ प्रत्युश २०१० मुळे. मजामस्ती बरोबरच विश्वाससर व सतीशसर यांच्याकडून खूप काही शिकायला मिळालं.

नाटकात भाग घेण्याचा माझा अनुभव तसा नवीनच होता. या आधी एक-दोन नाटकात मी काम केले, पण ते फार असे नव्हते. त्यामुळे आपली वाक्यफेक कशी असावी? समोरच्या कलाकाराबरोबर साद-प्रतिसाद कसे असावेत?- अशा अनेक गोष्टी सतीशकाकांकडून शिकायला मिळाल्या. तसेच नृत्यातही मी सहभागी असल्यामुळे विश्वाससरांनी शिकवलेले नृत्याचे धडे व बारकावे अशा ज्ञानवर्धक गोष्टींनी आम्ही आमची गंगाथडी भरून घेतली.

अखेर '५ जून प्रत्युश'चा दिवस उजाडला. आम्ही सर्वच या दिवसाची आतुरतेने वाट बघत होतो. सर्वांनीच या दिवसासाठी खूप मेहनत केली होती. कार्यक्रम सुरू होण्याआधी माझ्या मनात उत्साह व भीती या दोन्ही भावना एकत्रित होत्या. पण रंगमंचावर पाय ठेवताच उत्साहाने भीतीला मारले व आम्हा सर्वांचेच सादरीकरण खूप छान झाले. हा अनुभव मन प्रफुल्लीत करणारा होता. प्रत्युशमधून मिळालेली ही स्फूर्ती वर्षभर तरी टिकून राहील. प्रत्युशने फक्त युवापिढीलाच नाही तर तीन पिढ्यांना एकत्र आणले. कारण युवांच्या जोशाबरोबरच लहान मुलं व मोठ्या बायकांचाही जोश काही कमी नव्हता.

प्रभुतरुण युवामंचने केलेले हे काम नक्कीच लक्षवेधी आहे. आणि असे मन प्रफुल्लीत करणारा स्फूर्तिदायक प्रत्युश वर्षोवर्षे अबाधित करता यावा हीच सदिच्छा.

**-सौ. श्रेया शैलेंद्र तळपदे**
('युवा मंच' समिती सदस्य, कलाकार)

●

## प्रत्युश-२०१० - वाह वाह क्या बात है!

आपल्या प्रभुतरुणाने परत एकदा सुंदर कार्यक्रम सादर करून दाखवून दिलेय की, ''हम भी किसीसे कम नही''. इतर कुठल्याही व्यावसायिक कार्यक्रमाएवढा बहारदार कार्यक्रम आपल्या मुलांनी करून दाखवला.

शाब्बास! एकदम ढासू, चाबूक, तुफान परफॉर्मन्स

गेला महिना दीड महिना जी मेहनत तुम्ही घेतलीत त्याचा नतीजा म्हणजेच कालचा धडाकेबाज कार्यक्रम. सर्वांगाने काबिले तारीफ. मला विंगेत मदत करायची संधी मिळाली त्यामुळे मला ह्या शोसाठी जी काही कसरत तुम्ही सर्व करत होतात ती आंखो देखी पाहायला मिळाली. काय जोश, उत्साह होता सर्वांचा आणि त्यात एकामागून एक नृत्य सादर करण्यासाठी होणारी धावपळ. सर्वांनी केलेली मदत, हातभार हे खऱ्या अर्थाने टीमवर्क होते.

कार्यक्रमाचे स्क्रीप्ट, तसेच निवडलेली गाणी, संकल्पना उत्तम होती. तुम्ही पाठारे प्रभु नावे वापरून जी पात्रे उभी केलीत त्याने तर त्याला एक 'रियालिटी' टच आला आणि कुठे तरी तो राजू आणि रूपा आपलेसे वाटू लागले. त्यात श्री. व सौ. जय विजयकर आणि श्री. व सौ. विजय जयकर जोडीने विनोदीपणा आणला. डॉन फरकॅपने तर कहानीला ट्वीस्टटच दिला. त्याकरिता वापरलेली व्हिडियो क्लीप चांगलाच इफेक्ट देऊन गेली. नाटकात टाकलेली गाणी आणि नाच फारच छान. जणु काही नच बलिये, सुंदरा मनामध्ये वगैरे शो विसरायला लावले. खरंच एनर्जेटीक, इलेक्ट्रीफाईंग, एन्थुझियास्टीक, एक्सलंट नाच पाहायला मिळाला.

माझ्या मार्मिक डोक्यात डोकावलेली एक गोष्ट म्हणजे गेल्या वर्षी चुकून प्रत्युश कार्यक्रमात घुसलेला 'भैया' वर्षभरात 'हिरो'च्या भूमिकेत पाहायला मिळाला. अगदी आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीत दिसते तसे.सौरभने सुंदर अभिनय केला आणि त्याला काश्मिराने तर आपल्या चुणचुणीतपणाने साथ दिली. त्यांचा हम दिल दे चुकेच्या वेळचा ॲक्ट आणि स्क्रीनवरचे अजय देवगण आणि ऐश्वर्याच्या सीनचे टायमिंग तर अप्रतिम होते.

मराठी बाणा जपणारी गाणी तर युवा पिढीचा आणखी लोकनृत्याचा नजराणा होता. शोला जो काही भडकला तो थेट बन थनके येऊन वणव्यासारखा पेटला. त्यात जवानी दिवानगी देऊन प्रेम की नैया पार घेऊन गेली.

नाटेकरसर तुम्ही तर कमालच केलीत. काय नाचवलंत तुम्ही सर्वजणांना. एकदम जी जानसे मेहनत करून घेतलीत. तुमच्या अनिकेतने केलेली धावपळ मी पाहिली. खरंच सारखं सगळीकडे बारकाईने लक्ष ठेवत होता.

नाटेकरसर आणि जोशीसरांनी ताल आणि लय यांचा सुंदर संगम जुळवून आणला आणि त्यांना अप्रतिम साथ दिली ती मनीषने तांत्रिक गोष्टी सांभाळून. हे तिघेजण म्हणजे प्रत्युश-२०१०चे ब्रह्मा, विष्णु, महेश ज्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार आणि धन्यवाद.

बऱ्याच वर्षांनी परत एकदा उड्डाण करायला युवामंचचा हा उदय खऱ्या अर्थाने 'न्यू रायझिंग' ठरला. युवामंचाला प्रेरणा देणारे कै. सुहास कोठारे आणि कै. विहंग नायक यांना या युवा पिढीचा गर्व झाला असता. अर्थात आज युवामंचाच्या पाठीशी जे हात खंबीरपणे उभे आहेत त्यांना खात्री पटली असेल की ही मंडळी हे कार्य समर्थपणे पुढे चालू ठेवतील याची. त्या हातांच्या आशीर्वादाने आम्हा युवा पिढीलादेखील एक बळ मिळाले ज्यामुळे आम्ही आज काहीतरी करून दाखवायला तयार आहोत. आमच्यावर विश्वास ठेवल्याबद्दल धन्यवाद.

शेवटी काय:-

जब युवा हो आऊट ऑफ कंट्रोल

तब होठों को कर ले गोल

होट घुमा, सिटी बजा सिटी बजा के बोल...

अरो सोकाजी ऑल इज वेल...

**-चारुदत्त धैर्यवान**

●

## पाठारे प्रभु चॅरिटीज

दिनांक ६ जून २०१० रोजी सुरेश विठ्ठल सभागृहात चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. अजित विजयकर यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सभा संपन्न झाली. सभेत श्री. सुभाष राव, सुहासिनी कीर्तिकर, मुग्धा त्रिलोकेकर आणि अशोक तळपदे यांनी आपली मते मांडली. श्री. वीरपाल राणे यांनी उपस्थितांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांचे सविस्तर आणि साधार निराकरण केले. श्री. वीरपाल राणे आणि श्री. अजित विजयकर यांनी काही आगामी उपक्रमांची सभेला माहिती दिली. श्री. अजित विजयकर यांच्या समर्थ नेतृत्वा-खाली चॅरिटीजच्या कार्यकारिणीची मंडळी तत्त्वनिष्ठेने आणि तडफेने काम करीत आहेत. त्याबद्दल उपस्थितांना समाधानच वाटले. सभेचे कामकाज उत्कृष्टरीत्या पार पडले ही त्या समाधानात भर टाकणारी घटना होती.

## अभिनंदन

❀ सौ. श्रुती आणि डॉ. प्रदीप गजानन विजयकर यांच्या विवाह रौप्यमहोत्सवानिमित्त सुंदर सोहळा आयोजित करण्यात आला होता. हिंदी, मराठी सुरेल भावगीतांची मेजवानी देण्यात आली . खुद्द डॉ. प्रदीप, त्यांचा मुलगा डॉ. तन्मय आणि पुतण्या डॉ. अंबरीश विजयकर यांनीही गाणी म्हणून या मेजवानीचा स्वाद दुणा केला. डॉ. प्रफुल्ल विजयकरांचे निवेदन, डॉ. गजानन विजयकर आणि श्रीम. शीला मुकुंद कोठारे यांचे आशीर्वादपर बोल माधुरी वाढविणारे होते. सौ. श्रुती आणि डॉ. प्रदीप यांचे छायाचित्र असलेला देखणा केक आणि नंतरची आनंदाची लयलूट परभी संस्कृतीला ताजेपणा देऊन गेली. या रौप्यमहोत्सवी विवाहदिनानिमित्त प्रभुतरुणातर्फे त्यांचे अभिनंदन आणि अनेकानेक शुभेच्छा.

❀ डॉ. सुमन नवलकर यांच्या 'इटुकली घंटुली' या बालकादंबरीचे ढवळे प्रकाशनातर्फे वसुंधरा पेंडसेनाईक यांच्या हस्ते थाटामाटात प्रकाशन झाले. त्यांच्या कथेलाही 'चारचौघी' कथास्पर्धेत प्रथम पुरस्कार मिळाला. अभिनंदन.

❀ आमचे विश्वस्त श्री. विनोद प्रधान यांच्या कन्या सौ. स्वप्ना तेज वेलकर यांनी संसार सांभाळून बी. एड. केले. अभिनंदन.

❀ पाठारे प्रभु चॅरिटीजच्या पहिल्या महिला विश्वस्त असलेल्या सौ. मेधा जतेंद्र वाचकर यांची मफतलाल फायनान्सच्या मॅक्झीमस सिक्युरीटीज लिमिटेड या शाखेत सी.ई. ओ. (चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर) म्हणून नियुक्ती झाली. अभिनंदन.

## प्रभुतरुणास देणगी

❀ कै. प्रभा गोविंदराव जयकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या भगिनी श्रीम. मीना शंकरराव त्रिलोकेकर आणि श्रीम. स्नेहा संजय तळपदे यांजकडून रु. १०,०००/-

❀ सौ. अनारकली संदीप वेलकर आणि सौ. अपर्णा संयोग पेंढारकर यांजकडून त्यांचे आईवडील- सौ. नीला शिवनंदन राव आणि श्री. शिवनंदन रामराव राव यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त रु. १०००/-

❀ कस्तुर रवींद्र तळपदे आणि अनिल र. तळपदे यांजकडून रु. १००१/-

❀ सौ. शील आणि श्री. प्रफुल्ल श्रीपाद राणे यांजकडून त्यांचा पुत्र हिमेश याच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. २५१/-

❀ सौ. शील आणि श्री. प्रफुल्ल श्रीपाद राणे यांजकडून त्यांचा पुत्र हिमेश डिप्लोमा इन ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंटमध्ये यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. २५१/-

❀ सौ. सुविद्या आणि श्री. किरण विजयकर यांजकडून त्यांचा पुत्र श्री. सुमेध भुवनेश्वरच्या झेवियर्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटतर्फे मॅनेजमेंटमधील पदव्युत्तर डिप्लोमा उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. १००१/-

❀ श्री. उदय बाळाराम जयकर यांजकडून युवामंचच्या प्रत्युशकरिता रु. १००१/- (हा धनादेश उशीरा आल्याने कार्यक्रमात याची नोंद झाली नाही. क्षमस्व.)

❀ श्री. ऋद्धेश आणि ग्रीष्मा कीर्तिकरकडून त्यांचे वडील श्री. उमेशचंद्र कीर्तिकर यांच्या साठाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ (१५-३-१०) रु. ५०१/-

❀ सौ. छाया आणि श्री. दीपक आनंदराव तळपदेंकडून नात झाल्याबद्दल रु. २५१/-

❀ कै. श्रीम. वीणा जयंत रामदत्त विठोबा देसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त (२४-५-१०) त्यांचे नातू श्री. ज्ञानीन चिंतामणी जयंत देसाईंकडून रु. २५/-

❀ श्री. भरत राणेंकडून कन्येच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. १०१/-

❀ श्रीम. सुनीता वि, कोठारेंकडून रु. २५०/-

## परीक्षेतील सुयश

**डिप्लोमा इन ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट**

श्री. हिमेश प्रफुल्ल श्रीपाद राणे ६५टक्के

**बी. एड.**

सौ. स्वप्ना तेज वेलकर

**एमएस सीआयटी**

सौ. अमिता अभिजीत विजयकर ६८ टक्के

**पदव्युत्तर डिप्लोमा इन मॅनेजमेंट, ह्युमन रिसोर्स भुवनेश्वर**

श्री. सुमेध किरण विजयकर

**बारावी (विज्ञान)**

कु. अंबुजा प्रदीप नवलकर, ८९ टक्के

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ७ ऑगस्ट २०१० रोजी दुपारी ४ वाजता प्रभु सेमिनरी हायस्कूलचे सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार येथे संस्थेच्या अध्यक्षा सौ. वृंदा जयकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

त्याच दिवशी खालील स्पर्धा घेण्यात येतील.

१) स्मरणशक्ती स्पर्धा- स्टेजवर ठेवलेल्या वस्तू पाहून नंतर कागदावर लिहिणे. वस्तू पाहण्यास ३ मिनिटे दिली जातील. त्यानंतर ५ मिनिटात त्या वस्तुंची नावे लिहिणे (कागद पुरविला जाईल).

२) काव्यस्पर्धा- सभासद महिलांसाठी

विषय- माझे मन (काव्य घरून लिहून आणणे).

३) निबंध स्पर्धा- महिलांसाठी

विषय- क्षण आला भाग्याचा (शब्द मर्यादा ६०० शब्द). (निबंध घरून लिहून आणणे.)

मुलींसाठी विषय - (मराठी)-निसर्गाच्या सानिध्यात एक दिवस

(इंग्रजी) - A Day with Nature

स्पर्धकांनी काव्य किंवा निबंधाच्या कागदावर आपले नाव लिहू नये. पाकिटात वेगळ्या कागदावर लिहून पाठवावे.

काव्य व निबंध ७ ऑगस्ट २०१० पर्यंत चिटणीसांकडे पाठवावेत.

दरवर्षीप्रमाणे ज्या मुलींना शालेय व विश्वविद्यालयीन फी-शिष्यवृत्तीसाठी अर्ज करायचे असतील त्यांनी ते ३१ जुलै २०१० पर्यंत सौ. मेघना प्रदीप राणे, ब्लॉक क्र. १, पहिला मजला, सिद्धारूढ प्रसाद, ३६२, जे. एस. रोड, मुंबई-४००००२ येथे आणून द्यावेत.

संपर्क: चिटणीस, सौ. नीता सेंजीत- ९८२०१६६६२८, सौ. अक्षदा तळपदे- २२०९५९००, सौ. नूतन कीर्तिकर- २६०४९१५९

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाची एक दिवसीय वर्षा सहल स्वाद रिसॉर्ट, केळवे येथे रविवार, दिनांक ११ जुलै २०१० रोजी फक्त सभासदांसाठी आयोजित केली आहे. अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.

समाजातर्फे 'अभंगयात्रा' शनिवार दिनांक २४ जुलै, २०१० रोजी दुपारी ४ वाजता व्यंकटेश मंदिरात आयोजित केली आहे. तरी सर्वांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा, असे कार्यकारी समितीतर्फे कळविण्यात येत आहे. इच्छुक गायकांनी अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ५ सप्टेंबर २०१० रोजी सायंकाळी ५ वाजता प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई- ४००००२ येथे घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१) सूचना परिपत्रकाचे वाचन.

२) समाजाच्या शनिवार दिनांक ६ सप्टेंबर, २००९ रोजी पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

३) समाजाचा १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०चा कार्यवृत्तांत अहवाल वाचून मंजूर करणे.

४) समाजाच्या कार्यकारिणीचा १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० सालाचा जमाखर्चाचा ताळेबंद सादर करणे व मंजूर करून घेणे.

५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारी कामे.

**विशेष सूचना**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा , त्याच ठिकाणी, त्याच दिवशी आधी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर (म्हणजे ५.३० वा.) घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) समाजाचा अहवाल व जमाखर्चाचा ताळेबंद शनिवार दिनांक २८ ऑगस्ट २०१० व रविवार दिनांक २९ ऑगस्ट २०१० रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत समाजाचे चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर, चंद्रकला, डिलिव्हरी पोस्ट ऑफिससमोर, ७वा रस्ता, खार (प.), मुंबई- ४०००५२ येथे पहावयास मिळतील. काही प्रश्न असल्यास १ सप्टेंबर २०१० रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत लेखी स्वरूपात वरील पत्त्यावर देण्यात यावे.

सं. चिटणीस-

सौ. नीता मिलिंद सेंजीत-९८२०१६६६२८

श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर- ९८६७९५८५३५

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

३१-३-१० कु. रिशीता नीलेश देसाई

### कुर्यात् बटोर्मंगलम्

२३-५-१० निमिष महेश प्रभात जयकर, भटवाडी

३०-५-१० यशेश नितीश उदय कीर्तिकर, खार

### नांदा सौख्यभरे

९-४-१० श्री. हिमेश प्रफुल्ल राणे, कु. करुणा मधुकर पानगुंटी (आंतर ज्ञातीय)

१६-५-१० श्री. निखील अजित विजयकर, कु. सोनल अनिल भंडारी (आंतर ज्ञातीय)

२०-५-१० श्री. संकेत रंजनलाल धुरंधर, कु. चैत्राली शेखर अजिंक्य

२२-५-१० श्री. आनंद नैषध विजयकर, कु. नम्रता अनिल राव

२४-५-१० श्री. श्रेयस राजीव बालकराम देसाई, कु. निकीता भरत रामकृष्ण राणे

८-६-१० श्री. जितांशु प्रफुल्ल कोठारे, मनिषा मनोहर रवांडेकर (आंतर ज्ञातीय)

५-६-१० श्री. जिग्नेश दत्तात्रय पाटील, कु. मधुरा संतोष धैर्यवान (आंतर ज्ञातीय)

### विवाह रौप्यमहोत्सव

२९-५-१० डॉ. श्री. प्रदीप गजानन विजयकर, सौ. श्रुती (पूर्वाश्रमीच्या ज्योती मुकुंद कोठारे)

### विवाह सुवर्णमहोत्सव

श्री.शिवनंदन रामराव राव, सौ. शीला शिवनंदन राव

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३-४-१० | श्रीमती उषा दत्तात्रय धुरंधर, | वय ७२, | अमेरिका |
| १७-४-१० | श्रीमती प्रभा गोविंदराव जयकर, | | बेलापूर |
| २७-४-१० | श्री. किशोर शामराव तळपदे, | वय ७२, | सांताक्रूझ |
| १४-५-१० | श्री. पद्माकर शामराव कीर्तिकर, | वय ९४, | दादर |
| १६-५-१० | श्रीमती अमला शंकरराव आगासकर, | | डोंबिवली |
| २१-५-१० | श्री. कुंजविहारी रणविहारी तळपदे, | वय ९१, | सांताक्रूझ |
| २३-५-१० | डॉ. नलिनी नारायण विजयकर | वय ९७, | कुलाबा |
| | श्रीम. सुधा विजयकर | वय ९४ | ठाकुरद्वार |